Indian Journal of Social Sciences and Literature Studies
Vol. 8, Issue 1, March 2022
ISSN 2349-5634 (Print) ISSN 2455-0973 (online)

# महाविद्यालयातील ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांच्या समायोजन क्षमतेचा अभ्यास

**राम गंगाधरराव वजीरे**
संशोधक विद्यार्थी
ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग,
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ, औरंगाबाद

**नंदकिशोर अनंतराव खिल्लारे**
संशोधक विद्यार्थी
शिक्षणशास्त्र विभाग,
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ, औरंगाबाद

**डॉ.शाम सांगळे**
ग्रंथपाल
आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी
महाविद्यालय कडा,
ता.आष्टी जि.बीड

**प्रास्ताविक :**

आधुनिक काळ हा चिंता निर्माण करणारा काळ म्हणून ओळखला जात असे. आता या काळाच्या पुढच्या टप्प्यात ताण/तणाव हा शब्द वारंवार ऐकायला येऊ लागला आणि चिंतेची जागा ताणाने घेतली. त्यामूळे व्यक्तीला दैनंदिन जीवन जगत असतांना प्रत्येक ठिकाणी समायोजन करुन जीवन जगावे लागते. त्यामूळे थोड्याफार प्रमाणात ताण कमी होण्यास मदत होते.

सुमारे पन्नास वर्षापूर्वी समायोजन हा विषय आणि ही संकल्पना व्यक्तीमत्त्वा एवढीच महत्त्वाची समजली जात असे. त्या काळात या विषयांवर स्वतंत्र ग्रंथही लिहले गेलेत आणि संशोधन साहित्यातही यावर मोठ्या प्रमाणात शोधनिबंध लिहले गेलेत. समायोजन आणि विषमायोजन हे विषय अपसामान्य मानसशास्त्रात अनिवार्यपणे चर्चिले जात. व्यक्तीला मग ती कोणतीही असो. कर्मचारी असो किंवा घरगृहणी असो किंवा कोणीही असो त्याला त्याच्या कार्यात समायोजन करावे लागते.

ग्रंथालयात नौकरी करत असतांना ग्रंथालयातील वातावरण, ग्रंथालयातील काम करण्याची पध्दत, पुस्तकांची क्रमवार रचना, आपले सहकारी, शिपाई तर मुख्य ग्रंथपालापर्यंत त्या कर्मचाऱ्याला समायोजन करावे लागते किंवा प्रत्येकाशी जूळवून घ्यावे लागते. म्हणजेच आपण ज्या ठिकाणी व्यक्ती आहे त्या ठिकाणी समायोजन असते असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

मानवी वर्तनाचा संदर्भ व्यक्तिमत्व आणि परिस्थिती यांच्याशी आहे. उत्क्रांतीवादानुसार वर्तनाचा हेतू परिस्थितीशी प्रतियोजन साधून व्यक्तीने आपले अस्तित्त्व टिकविणे हाच आहे. त्यामूळे व्यक्तीमत्त्वाची घडणच मूळची या उत्क्रांतीवादी भूमिकेनुसार होते. समायोजन ही संकल्पना व्यक्तीसापेक्षी किंबहूना व्यक्तीमत्त्वसापेक्षी आहे. गार्डन ऑलपोर्ट ह्या मानसशास्त्रज्ञानी व्यक्तीमत्त्वाची व्याख्या केलेली आहे म्हणजे समायोजन या संकल्पनेचे महत्त्व अधिक स्पष्ट होईल.

Personality is the dynamic organization within the individual of those psychophysical systems that determine his unique adjustments to his environment.

याचा अर्थ असा की, व्यक्तीमत्त्व ही एक गतिशील संघटना आहे. हे संघटन व्यक्ति अंतर्गत विविध मनोशारीरिक प्रणालीचे आहे. या संघटनेमूळेच व्यक्तीचे सभोवतालच्या परिस्थितीशी समायोजन होत असते. प्रत्येक व्यक्तीमध्ये हे संघटन वैशिष्ट्यपूर्ण असते. यातील महत्त्वाचा भाग म्हणजे व्यक्तीमत्त्व हे व्यक्तीअंतर्गत संघटन असून त्याचा हेतू परिस्थितीशी सामंजस्य साधने असा आहे. व्यक्तीला आपले अस्तीत्त्व टिकविण्यासाठी हे सामंजस्य साधावे लागते.

समायोजन ही व्यक्तीच्या जीवनातील अनिवार्य आणि सर्वकश अशी प्रक्रिया आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात समायोजन करावे लागतात. ती क्षेत्रे म्हणजे सामाजिक क्षेत्र, व्यावसायिक क्षेत्र, कौटुंबिक क्षेत्र, भावनिक क्षेत्र, स्वास्थ्याविषयक क्षेत्र इत्यादी होत. या प्रत्येक क्षेत्रात व्यक्तीला समायोजीत व्हावे लागते. त्यापैकी महाविद्यालयातील अत्यंत महत्त्वाचा भाग म्हणजे ग्रंथालय होय. ग्रंथालयातील कर्मचारी कशा प्रकारे कार्य करतात, काम करीत असतांना कोणकोणत्या बाबींशी त्यांना जूळवून घ्यावे लागते ह्याचा अभ्यास करण्याचा छोटासा प्रयत्न.

**समायोजनाचे प्रकार :**

१) वैयक्तीक समायोजन २) सामाजिक समायोजन ३) वैवाहीक समायोजन ४) कौटूंबिक समायोजन ५) शैक्षणिक समायोजन ६) लैंगीक समायोजन ७) व्यवसायीक समायोजन

वरील प्रत्येक क्षेत्रात व्यक्तीला समायोजन हे करावेच लागते. समायोजनाशीवाय व्यक्तीला पर्याय नाही, उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत व्यक्तीला प्रत्येक क्षणी समायोजन हे करावे लागते.

**अभ्यासाची गरज आणि महत्त्व :**

औरंगाबाद शहरामध्ये बहूसंख्य महाविद्यालयाची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याचे दिसून येते. काही महाविद्यालयाच्या इमारती प्रशस्त आहेत. परंतू काही महाविद्याये आजही भाड्याने इमारती घेऊन चालविली जातात. मग इमारत जर भाड्याने असेल तर त्यामध्ये असलेल्या ग्रंथालयाची जी खोली आहे किंवा इमारत आहे ती कशी आहे. ग्रंथालयातील कर्मचारी त्या कमी जागेत कशा प्रकारे समायोजन करतात? काही महाविद्यालये हे विना अनुदानीत आहेत तर मग त्या महाविद्यालयातील ग्रंथालयीन कर्मचारी यांना कमी पगार दिला जातो का? त्यामध्ये समायोजन कसे करतात. थोडक्यात ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांच्या समायोजन क्षमतेचा अभ्यास करुन त्यावर उपाय योजना करण्यासाठी प्रस्तूत अभ्यासाची गरज व महत्त्व आहे.

**उद्दिष्टे :**

१) पुरुष ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांच्या समायोजन क्षमतेचा अभ्यास करणे
२) महिला ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांच्या समायोजन क्षमतेचा अभ्यास करणे

३) अनुदानित ग्रंथालयीन कर्मचारी व विनाअनुदानित महाविद्यालयातील ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांच्या समायोजन क्षमतेचा अभ्यास करणे.

**परिकल्पना :**

१) पुरुष ग्रंथालयीन कर्मचाऱ्यापेक्षा स्त्री ग्रंथालयीन कर्मचाऱ्यामध्ये समायोजन क्षमता अधिक आहे.

२) अनुदानित महाविद्यालयातील ग्रंथालयीन कर्मचारी आणि विनाअनुदानीत महाविद्यालयातील ग्रंथालयीन कर्मचाऱ्यामधील समायोजन क्षमतेत फरक आढळतो.

**संशोधन पध्दती :**

सदरील अभ्यास हा सर्वेक्षण पध्दतीने पूर्ण केला आहे.

**संशोधन नमुना :** प्रस्तूत अभ्यासासाठी औरंगाबाद शहरातील वरिष्ठ महाविद्यालयातील ग्रंथालयीन कर्मचाऱ्यामधून ८० कर्मचाऱ्यांची नमुना म्हणून निवड केली. त्यामध्ये ४० महिला कर्मचारी व ४० पुरुष कर्मचारी यांचा समावेश आहे.

**साधने :**

सदरील अभ्यासाच्या माहिती संकलनाकरीता समायोजन मापन चाचणीचा वापर केलेला आहे. या चाचणीत एकूण १२० विधाने आहेत. जे सहा घटकात विभागलेले आहे. ते घटक म्हणजे व्यक्तीचे कौटुंबिक, भावनिक, आरोग्य विषयक, शैक्षणिक, लैंगिक आणि सामाजिक समायोजन होय.

ही चाचणी Psy-com SERCICES यांनी १९९४ साली विकसित केली आहे.

सांख्यिकीय परिमाण : प्रस्तूत संशोधनासाठी मध्यमान (Mean), प्रमाण विचलन (SD), टी-परीक्षण (T-Test) या सांख्यिकीय परिमाणाचा वापर करण्यात आला आहे.

माहितीचे संकलन विश्लेषण व अर्थनिर्वचन :

संकलीत माहितीचे तालीकीकरण करुन मध्यमान, प्रमाण विचलन आणि टी-परिक्षीका यांच्या साह्याने माहितीचे विश्लेषण केले.

**परिकल्पना क्रमांक १ :** पुरुष ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांपेक्षा स्त्री ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांमध्ये समायोजन क्षमता अधिक आहे.

| नमुना प्रकार | मध्यमान | प्रमाण विचलन | नमुना | डी.एफ. | टी-परीक्षिका |
|---|---|---|---|---|---|
| पुरुष | 115.20 | 15.14 | 40 | 78 | 0.08 |
| महिला | 115.50 | 9.80 | 40 | | |
| (df=78, t-test=0.01=2.64, 0.05=1.98) | | | | | |

तक्ता क्रमांक एक नुसार असे निदर्शनास येते की, पुरुष व महिला ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांच्या समायोजन क्षमताचे टी-मूल्य हे ०.०८ हे (सार्थकता स्तर०.०५या स्तरावर) टेबल मूल्य १.९८ पेक्षा कमी आहे. म्हणून मध्यमानातील फरक हा असार्थक आहे.

यावरुन पुरुष व महिला ग्रंथालयीन कर्मचाऱ्याच्या समायोजन क्षमतेत कोणत्याही प्रकारचा फरक आढळून येत नाही.

**परिकल्पना क्रमांक २ :** अनुदानित व विना अनुदानीत महाविद्यालयीन ग्रंथालय कर्मचाऱ्यामधील समायोजन क्षमतेत फरक आढळतो.

| नमुना प्रकार | मध्यमान | प्रमाण विचलन | नमुना | डी.एफ. | टी-परीक्षिका |
|---|---|---|---|---|---|
| अनुदानित महाविद्यालयीन ग्रंथालयीन कर्मचारी | 110.20 | 13.80 | 40 | 78 | 2.99 |
| विनाअनुदानित महाविद्यालयीन ग्रंथालयीन कर्मचारी | 120.50 | 10.30 | 40 | | |
| (df=78, t-test=0.01=2.64, 0.05=1.98) | | | | | |

तक्ता क्रमांक दोन नुसार असे निदर्शनास येते की, अनुदानित-विनाअनुदानित महाविद्यालयातील ग्रंथालयीन कर्मचाऱ्याच्या समायोजन क्षमतांचे टी-मूल्य हे २.९९ हे (सार्थकता स्तर ०.०५ या स्तरावर) टेबल मूल्य १.९८ पेक्षा कमी आहे. म्हणून मध्यमानातील फरक हा असार्थक आहे. यावरुन अनुदानित-विनाअनुदानित महाविद्यालयातील ग्रंथालयीन कर्मचाऱ्याच्या सामाजिक क्षमतामध्ये पातळीमध्ये सार्थक फरक असल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष :**

१. पुरुष ग्रंथालयीन कर्मचारी व महिला ग्रंथालयीन कर्मचारी यांच्या समायोजन क्षमता पातळीमध्ये फरक नाही.
२. अनुदानित ग्रंथालयीन कर्मचाऱ्यापेक्षा विना अनुदानित महाविद्यालयातील ग्रंथालयीन कर्मचाऱ्यामध्ये समयोजन क्षमता चांगली आढळून आली.

शिफारशी : ग्रंथालयीन कर्मचाऱ्याच्या समायोजन क्षमता पातळीमध्ये सकारात्मक बदल होण्यासाठी महाविद्यालयामध्ये कार्यशाळा, उद्‌बोधनवर्ग, मार्गदर्शन, समूपदेशन इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन करावे.

**संदर्भ ग्रंथ :**

१. बेस्ट जे. डब्ल्यु (११९५), रिसर्च इन एज्युकेशन (७ वी आवृत्ती) नवी दिल्ली : प्रेन्टीस हॉल ऑफ इंडीया प्रायव्हेट लिमिटेड.
२. Asthana Bipin (2005), Measurment and Evaluation in Psychology and Education Ed. 8, Agra : Vinod Pustak Mandir.
३. पलसाने, ग.न. (२००८), मानसशास्त्र, पूणे : कॉन्टीनेटल प्रकाशन
४. करंदीकर, एस. (२००९), शैक्षणिक मानसशास्त्र, फडके, प्रकाशन
५. राजहंस, एम.पाटील, ए. सुर्वे, एस. (२००१). अपसामान्यांचे मानसशास्त्र, पूणे : उन्मेष प्रकाशन.